## लोकशाही भक्कम करण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न करूया : आ. प्रशांत ठाकूर

**महासागर प्रतिनिधी,**



पनवेल: लोकशाही भक्कम करण्यासाठी आपण एकत्र येऊया, लोकशाही जागृत ठेवण्याच्यासाठी आपण सारे मिळून प्रयत्न करत राहूया, असे प्रतिपादन आमदार प्रशांत ठाकूर यांनी केले. केंद्र व राज्य शासनाच्या सूचनेप्रमाणे आणीबाणी कालावधीत लोकशाहीचा लढा व बंदिवास भोगावा लागलेल्या मान्यवरांचा सन्मान या विशेष कार्यक्रमाचे आयोजन आजदिनांक 25 जुन रोजी आद्य क्रांतीकारक वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहामध्ये करण्यातआले यावेळी ते बोलत होते. पुढे ते म्हणाले,आणीबाणीच्या काळात लोकशाही पुर्नप्रस्थापित करण्यासाठी , त्यावेळी जे अन्याय अत्याचार सुरू होते, ते थांबविण्यासाठी ज्यांनी सक्रिय भूमिका बजावली अशा मान्यवरांच्या कर्तृत्वाचा अभिमान पनवेलकरांना आहे. या कार्यक्रमाचे आयोजन करण्यासाठी महापालिकेने पुढाकार घेतला याबद्दल त्यांचे मनःपूर्वक आभार.

या कार्यक्रमास महापालिका कार्यक्षेत्रातील आणीबाणी कालावधीत लोकशाहीच्या लढ्यांमध्ये बंदिवास भोगावा लागलेले 7 मान्यवर,आमदार प्रशांत ठाकूर, मनपा आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे ,उपायुक्त सर्वश्री डॉ.वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रविकिरण घोडके, स्वरूप खारगे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, लेखा परिक्षक निलेश नलावडे,शहर अभियंता संजय कटेकर, सहाय्यक आयुक्त सर्वश्री श्रीराम पवार, डॉ. रूपाली माने, सुबोध ठाणेकर, माजी नगरसेवक नितीन पाटील, अनिल भगत, गणेश कडू, शिवसेना जिल्हा प्रमुख रामदास शेवाळे, शहर मंडल अध्यक्ष सुमित झुंजारराव, महापालिका अधिकारी व नागरिक या कार्यक्रमांस उपस्थित होते.

## अलिबाग मधील वरसोली येथे रेड लाईट एरिया चा पर्दाफाश

**महासागर प्रतिनिधी,**

अलिबाग: अलिबाग तालुक्यातील वरसोली येथील लोटस कॉटेज या हॉटेलमध्ये सुरु असलेल्या वेश्या व्यवसायावर पोलिसांनी धडक कारवाई केली आहे. या कारवाईत पोलिसांनी एका पीडित महिलेची सुटका करत दोन आरोपींना अटक केली आहे. 24 जून 2024 रोजी पहाटे साडेतीनच्या सुमारास अलिबाग पोलिसांनी छापा टाकून लोटस कॉटेजमध्ये सुरु असलेल्या अनैतिक व्यापाराची माहिती मिळवल्यानंतर कारवाई केली. या प्रकरणात महिला आरोपी सप्पा (50, रा. ममता नगर, अलिबाग; मूळ रा. दक्षिण 24 परगणा, पश्चिम बंगाल) आणि राजेश रामलखन चौपल (25, रा. घरभंगा) यांनी पीडित महिलेला व्यवसायासाठी प्रवृत्त करून पुरुष ग्राहकांना पुरवले असल्याचा आरोप आहे. पोलिसांनी या छाप्यात एकूण ₹25,500 किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. गुन्हा क्रमांक 111/2015 नुसार संबंधितांवर भारतीय दंड संहिता कलम 143, 3 (5) तसेच अनैतिक व्यापार प्रतिबंध अधिनियम 1956 चे कलम 3, 4, 5 अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस निरीक्षक किशोर साळे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरु आहे.

## रायगड जिल्ह्यातील ३८९ इमारती धोकादायक, प्रशासनानं घेतला मोठा निर्णय

**महासागर प्रतिनिधी,**

अलिबाग: पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर रायगड जिल्ह्यातील प्रमुख शहरांमध्ये सर्वेक्षण करण्यात आलेआहे. यात ३८९ इमारती धोकादायक परीस्थितीत असल्याचे निदर्शनास आले आहे. या सर्व इमारतींमधील रहिवाश्यांना सुरक्षितस्थळी स्थलांतरीत होण्याचे निर्देश प्रशासनाच्या वतीने देण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी जिल्ह्यातील सर्व नगरपालिका आणि नगरपंचायतींना धोकादायक इमारती आणि धरणांचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या निर्देशानंतर पनवेल महानगर पालिका आणि सर्व नगरपालिकांनी आपले अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर केले. या शहरांमध्ये प्राथमिक पहाणीत ३८९ इमारती धोकादायक असल्याचे दिसून आले. यात २२ शासकीय इमारती तर उर्वरीत खाजगी इमारतींचा समावेश आहे. ३६७ खाजगी इमारतींचा समावेश आहे. यात पनवेल येथे सर्वाधिक ८० ,कर्जत येथे ७, उरण ५१, खोपोली ७०, पेण ३८, महाड २७, श्रीवर्धन १५, अलिबाग ९, रोहा ११, मुरुड २२, माथेरान २, खालापूर ४, म्हसळा ८, माणगाव २४, पोलादपूर १३, पाली ८, धोकादायक इमारतींचा समावेश आहे. या सर्व इमारतींमधील रहिवाश्यांना महाराष्ट्र नगर परिषद, नगरपंचायत अधिनियम १९६५ च्या कलम १९५ अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत. यानुसार इमारतींमधील रहिवाश्यांना तातडीने सुरक्षित स्थळी स्थलांतरीत होण्यास सांगण्यात आले आहे. त्याचबरोबर खालापूर, तळा, म्हसळा, माणगाव, सुधागड आणि पोलादपूर येथील नगरपंचायतीना धोकादायक इमारतींचे सर्वेक्षण करून, तेथील रहिवाश्यांना सुरक्षित स्थळी स्थलांतरीत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## हिंदी सक्तीविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा पनवेल मधील शाळेंना इशारा

**महासागर प्रतिनिधी,**



नवीन पनवेल : राज ठाकरे यांच्या आदेशानुसार आणि महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेना अध्यक्ष अमित ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखाली, नवीन पनवेल मधील स्थानिक शाळांना हिंदी सक्तीबाबत महाराष्ट्र नवनिर्माण सेना व महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेतर्फे आवाहन करण्यात आले. ज्या ज्या शाळेमध्ये हिंदी भाषा शिकवली त्या शाळेला पूर्ण पणे हिंदी विषय बंद करायला सांगण्यात आले तसेच शाळेने आम्ही शिकवणार नाही असे आश्वासन दिले. शाळांमध्ये विद्यार्थ्यांवर हिंदी भाषा शिकण्याचा आग्रह धरणे किंवा हिंदी पुस्तकांचे एकतर्फी वितरण केल्यास, महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या धोरणानुसार त्यास तीव्र विरोध करण्यात येईल,असा इशारा यावेळी देण्यात आला. त्यावेळी पनवेल महानगर अध्यक्ष योगेश चिले, पनवेल महानगर अध्यक्ष मनविसे ॲड.अनिकेत मोहिते, रायगड जिल्हा अध्यक्ष विद्यार्थिनी ॲड.तेजस्विनी ढवळे, रायगड जिल्हा सचिव वर्षा पाचभाई, पनवेल तालुका संघटक पूजा मोहन, पनवेल महानगर अध्यक्ष स्वरूपा सुर्वे, हर्षा लाड, मनीषा देशमुख, विभाग अध्यक्ष अभिजित निकम, आयुष घार्गे, सौरभ पाटोळे, उपविभाग अध्यक्ष तुषार रवींद्र पवार, अविष्कार अरविंद मोहिते, शाखा अध्यक्ष अक्षय दिलीप कुले, मनीष महादेव चितळे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

## नम्रता कांदळगावकर यांच्या वाढदिवसानिमित्त माथेरान मध्ये हृदयरोग तपासणी शिबिर संपन्न

**महासागर प्रतिनिधी,**



माथेरान: पर्यटन स्थळ असलेल्या माथेरानमध्ये मंगळवार दि 24 रोजी भारतीय जनता पार्टी माथेरान शहर व शुश्रुषा हार्ट केअर आणि स्पेशालिटी हॉस्पिटल,नवी मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजने अंतर्गत भाजप कर्जत तालुकाध्यक्षा मा नम्रता नितीन कांदळगावकर यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधत माथेमधील नागरिकांसाठी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. सदर शिबिरावेळी हृदयरोग ई.सी.जी., रक्तदाब इत्यादिंचे तपासणी करून तज्ञ डॉक्टरांकडून सल्ला देण्यात आला. शक्यतो एखाद्या रुग्णाला अँजिओग्राफी करावयाची झाल्यास त्या रुग्णाला 15000 /- ते 20000/- रुपये मोजावे लागतात मात्र हे सर्वांच्याच आवाक्यात नसते त्यामुळे गरजू व गरीब व्यक्ती अँजिओग्राफी या शास्त्रक्रियेपासून वंचित राहू नये व त्यांना त्यांच्या आजाराचे तात्काळ निदान व्हावे केवळ या उद्देशाने भारतीय जनता पार्टी माथेरान व उपाध्यक्ष सुभाष भोसले यांच्या पुढाकारातून या मोफत शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरावेळी शहरातील 80 नागरिकांनी लाभ घेतला असून 15 नागरिकांची अँजिओग्राफी करावी लागणार असल्याचे शिबिरावेळी निष्पन्न झाले. केवळ फक्त 1000 / रुपयात ही ऍन्जिओग्राफी रुग्णांना करता येणार आहे. यासाठी आयोजकांच्या वतीने लवकरच याचे नियोजन करण्यात येणार आहे याप्रसंगी नम्रता कांदळगावकर,माथेरानचे राजेश चौधरी यांचा वाढदिवस आणि सुभाष भोसले आणि साक्षी भोसले यांच्या लग्नाचा वाढदिवस केक कापून साजरा करण्यात आला.यावेळी नेरळ मंडल अध्यक्ष नरेश मसणे,माजी कर्जत मंडल अध्यक्ष राजेश भगत माथेरान शहराध्यक्ष प्रवीण सकपाळ,माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी नितीन कांदळगावकर, प्रकाश पेमारे,नम्रता कांदळगावकर, माजी कर्जत पंचायत समिती सदस्या, सौ सुप्रिया भगत, सुहासिनी शिंदे,प्रतिभा घावरे, संध्या शेलार, साक्षी भोसले, शीतल कदम, मेघा कोतवाल,प्रदीप घावरे,चंद्रकांत जाधव,राजेश चौधरी,अरविंद शेलार,विलास पाटील,शैलेंद्र दळवी आदी मान्यवर उपस्थित होते.

## २४ जून २०२५ – प्रसाद चिकित्सा संस्थेत परमपूज्य श्री गुरुमाईजींच्या वाढदिवसानिमित्त विविध सेवाभावी उपक्रम

**महासागर प्रतिनिधी,**

स्थान: प्रसाद चिकित्सा , गणेशपुरी
तारीख: २४ जून २०२५

तानसा खोऱ्यातील परिसरात वैद्यकीय, सामाजिक, शेती, पर्यावरण आणि शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या प्रसाद चिकित्सा या स्वयंसेवी संस्थेत, परमपूज्य श्री गुरुमाई यांच्या वाढदिवसानिमित्त दरवर्षीप्रमाणे या वर्षी देखील २४ जून २०२५ रोजी विविध सेवाभावी उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

या विशेष दिवशी, प्रसाद चिकित्साच्या रुग्णालयाने खालील प्रमाणे मोफत आरोग्य सेवा देले:

1. सामान्य वैद्यकीय तपासणी व उपचार (General OPD)
2. मानसोपचार तपासणी उपचार व समुपदेशन (Psychiatry OPD)
3. दंतचिकित्सा तपासणी व उपचार (Dental Check-up)
4. नेत्र तपासणी व उपचार (Eye Check-up) व मोफत औषधवाटप

या आरोग्य शिबिरातून सुमारे 300 गरजू व दूरवरून आलेल्या रुग्णांनी लाभ घेतला.

सर्व रुग्णांना गरजेनुसार मोफत औषदोपचार व मोतीबिंदू ऑपरेशनकरिता विशेष सवलत देण्यात आले.

तसेच, प्रसाद चिकित्सा संस्थेच्या अंगणवाडी पोषण कार्यक्रमांतर्गत १९ अंगणवाड्यांतील सुमारे 450 बालकांना विशेष गोड पदार्थ, दूध आणि आरोग्यदायी नाश्ता वाटप करण्यात आला.

□शेतकऱ्यांना फळरोपे वाटप : शेती प्रकल्पांतर्गत गोराड फार्म येथे एकूण 56 शेतकऱ्यांना सुमारे 5344 फळबागे चे कलम रोपे वाटप करण्यात आले असून यावर्षी 1 लाख रोपांचे वाटप व संवर्धन करण्याचा संस्थेचा मानस आहे.

□महिला बचत गटामार्फत



गुरुमाईना मानवंदना : चाळीसगाव येथे महिला बचत गटातील महिलांनी मोठ्या जल्लोषाने श्री गुरुमाईजींचा वाढदिवस साजरा केला. यामध्ये नामसंकीर्तनाने कार्यक्रमाची सुरवात झाली, संस्था प्रतिनिधी मार्फत महिला बचत गटांना संस्थेचा विविध उपक्रमाची माहिती देण्यात आली व उपस्थितांना प्रसाद वाटप करण्यात आले, यामध्ये एकूण 55 महिला व संस्थेचे प्रतिनिधी उपस्थित होते.

या सेवाभावी उपक्रमातून प्रसाद चिकित्साने गरजू लोकांपर्यंत प्रेम, सेवा आणि आरोग्य पोहोचवण्याचा वसा पुन्हा एकदा जपला.

## एस कॉन कन्ट्रक्शन मुळे देशमुख कांबळे येथे दुर्गंधीचे साम्राज्य

**महासागर प्रतिनिधी,**



महाड: तालुक्यातील देशमुख कांबळे येथे पिडिलाइट अंतर्गत एस कोण कन्ट्रक्शन कंपनीने कन्ट्रक्शन च्या कामासाठी कॉलनी उभारली आहे त्या कॉलनीमध्ये या ठेकेदाराने कामासाठी आणलेले लेबर यांच्यासाठी फक्त दहा शौचालयाची उभारणी केली आहे तसेच अन्नसाठाचा बोला त्या कॉलनीमध्ये साचून ठेवला आहे या सर्व गोष्टीची दुर्गंधी मारीत असल्याने ही दुर्गंधी सर्व वातावरणात देशमुख आमले येथे पसरले असून यामुळे जनता येतील वैवाहिक झाली आहे त्या दुर्गंधीने जनतेस रोगप्रतिकारक रोग होऊ शकतात त्यामुळे देशमुख आमलेतील जनतेच्या आरोग्यात बिघाड होऊ शकतो या गोष्टीकडे देशमुख कांबळे ग्रामपंचायत डोळेझाक करीत आहे जनतेच्या जीवाशी खेळणाऱ्या या कॉलनी बंद करण्यात यावी अशा मागणीला जोर धरत असून त्वरित ही कॉलनी बंद करण्याची मागणी देशमुख अमल्यातील समाजसेवक पी एल देशमुख यांनी केली आहे

## पडसरे आश्रमशाळेतील शेकडो विद्यार्थी कर्मचारी पर्यटक व ग्रामस्थांचा जीव टांगणीला

**महासागर प्रतिनिधी,**



सुधागड: पावसाळी पर्यटनासाठी प्रसिद्ध असलेल्या सुधागड तालुक्यातील पडसरे गावाला जोडणारा पुल अक्षरशः मोडकळीस आला असून धोकादायक अवस्थेत आहे. हा पुल पडसरे गावाला व येथील आदिवासी आश्रमाशाळेला सुधागड तालुक्यातील सर्व गावांशी जोडतो. परिणामी पडसरे आश्रमशाळेतील शेकडो विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी, येणारे पर्यटक व ग्रामस्थांचा जीव टांगणीला लागला आहे.

या पुलाचे संरक्षण कठडे तुटलेल्या अवस्थेत आहेत. संरक्षक कठड्याच्या लोखंडी सळया बाहेर निघाल्या आहे. सध्यातर संरक्षण कठाडेच उरलेले नाहीत. परिणामी वाहने व पादाचारी पुलाखाली कोसळून अपघाताची शक्यता आहे. याशिवाय पुलाच्या खालील स्लॅब जीर्ण झाला असून स्लॅबच्या सळ्या देखील बाहेर निघाल्या असून त्या खाली लोंबकळत आहेत. एप्रिल 2018 साली या पडसरे पुलाची व येथील प्रसिद्ध अशा धबधब्याची तत्कालीन रायगड जिल्हाधिकारी डॉ. विजय सुर्यवंशी यांनी पाहणी केली होती. व त्यांनी पुल दुरुस्ती बाबत संबंधित विभागाला तात्काळ सूचना दिल्या जातील असे सांगितले होते. मात्र आजतागायत पुलाची कोणतीच डागडुजी केली गेलेली नाही.

या पुलाचा वापर पडसरे, लोळगेवाडी, एकलघर, महागाव, देउळवाडी, कवेलेवाडी, कोंडक आदिवासीवाडी, भोप्याचीवाडी, गोमाशी आदिवासीवाडी आदी गावातील नागरीक करतात. निसर्गाचा आनंद लुटण्यासाठी येणारे पर्यटक देखील या पुलाचाच वापर करतात. या पूला खालुनच धबधब्याचे पांढरे खळखळणारे पाणी वाहते. या मार्गावर वाहनांची वर्दळ सुरु असते. पुलावरून नागरिकांची देखील रेलचेल सुरु असते. पडसरे आदिवासी आश्रमशाळेत देखील मोठ्या संख्येने विद्यार्थी येत असतात. त्यामुळे येथील रस्ते व नदी पुल सुस्थीतीत व सुरक्षित असणे गरजेचे आहे. त्यामुळे संभाव्य धोका लक्षात घेवून भविष्यातील दुर्घटना टाळण्यासाठी प्रशासनाने पडसरे पुलाची तत्काळ दुरुस्ती करावी. व सर्वांना दिलासा द्यावा अशी मागणी स्थानिक ग्रामस्थ व पर्यटकांनी केली आहे.

## माजी विद्यार्थ्यांकडून शालेय विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप.

**महासागर प्रतिनिधी,**



मुरुड जंजिरा: सर्व माजी विद्यार्थी एकवटून शालेय विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या वस्तू मिळाव्यात यासाठी स्वतःच्या आर्थिक कमाईतून खर्च करून पिटसई येथील अशोक ल.लोखंडे विद्यालयातील इयत्ता पाचवी ते दहावी मधील सुमारे तीनशे विद्यार्थ्यांसाठी परीक्षेसाठी आवश्यक असणारे पॅड,प्रत्येक विद्यार्थ्यास पेन बॉक्स,कंपास पेटी अशा उपयोगी वस्तूचे सुमारे तीनशे शालेय विद्यार्थ्यांना मोठ्या प्रमाणात वाटप करण्यात आले आहे.नुकतीच शाळा सुरू झाल्याने शालेय विद्यार्थ्यांना आवश्यक असणाऱ्या वस्तू मिळाल्याने त्यांच्या चेहऱ्यावर हसू फुलले.या कार्यक्रमाचे दीपप्रज्वलन या शाळेचे अध्यक्ष- खेळू वाजे सचिव संजय रेडीज, या विद्यालयाचे मुख्याध्यापक अरुण खुळपे सर यांनी केले.यावेळी उपस्थित शिक्षक वृंद व संस्थेचे पदाधिकारी यांनी माजी विद्यार्थ्यांचे स्वागत पुष्पगुच देऊन करण्यात आले. यावेळी या शाळेचे अध्यक्ष खेळू वाजे यांनी आपले मनोगत व्यक्त करताना सांगितले की,या शाळेतून शिकून जाऊन आपले भवितव्य बनवत असताना आपण ज्या शाळेत शिकलो त्या शाळेस आपण काही तरी देणे लागतो ही भावना मनात ठेऊन माजी विद्यार्थ्यांकडून शाळेच्या विद्यार्थ्यांसाठी मोठे योगदान दिल्याबद्दल त्यांनी सर्व माजी विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक केले.यावेळी तन्वीर पल्लवकराने आपल्या मनोगतात सांगितले की,इयत्ता पाचवी मधील सर्व विद्यार्थ्यांना मी स्कूल बॅग वाटप करणार आहे असे सांगिले, तर नूतन घोंगे यांनी सांगितले की शिक्षणाची किंमत मला आज कळली असून शिक्षण घेत असताना सर्वांनी उच्च शिक्षित होणे खूप आवश्यक आहे.शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे आम्ही प्रगती करू शकलो तेव्हा मुलानी अभ्यास वेळच्या वेळी करावा असा संदेश यावेळी त्यांनी दिला.सदरील कार्यक्रमासाठी माजी विद्यार्थी सुदेश काते, सुषमा भात्रे प्रकाश कजबले, देविदास महाडीक, निलम सुगदरे, रतन मालुसरे प्रविण धुमाळ, प्रियंका पाडगे,नूतन घोंगे, लक्ष्मण बैंकर लक्ष्मण महाडीक सुरेश नाडकर, केतन भात्रे, देवेंद्र भौड कल्पेश महाडीक ,देवचंद महाडिक हे माजी विद्यार्थी उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार भरत नाडकर यांनी केले.

## पूर्व वैमनस्यातून बेदम मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी.
## तळा पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**महासागर प्रतिनिधी,**

तळा: मागील भांडणाचा राग काढून तळा येथील सार्वजनिक रस्त्यावर लक्ष्मण उर्फ (बाबू ) गजानन शिंदे, दिलीप गजानन शिंदे, नितीन बाईत, व अविनाश लक्ष्मण शिंदे, या चौघांनी मिळून राहुल सोमनाथ गोळे वय (३६) रा.परीट आळी, तळा यांना बेदम मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली. याबाबत सविस्तर वृत्त असे की दिनांक २ डिसेंबर २००८ रोजी गट नं. १८४अ मधील जुन्या थाल (बांध) च्या पुर्वेकडील सर्व जमीन गजानन बाबू शिंदे यांच्याकडून १) सोमनाथ सर्जेराव गोळे २) दादा दशरथ चव्हाण (३) रमेश नाना जाधव ४) सुखदेव दशरथ चव्हाण ५) रविंद्र सुदाम चव्हाण ६) सतिष राम गोळे ७) एकनाथ पाटलू चव्हाण यांनी साध्या साठे करारावर रक्कम तीन लाख रूपयावर घेतली होती. सदर जमीनीवर झोपडी बांधून फिर्यादी व कुटुंबीय राहत आहेत. सदर जमीन नावे होण्यासाठी फिर्यादी यांनी प्रयत्न केले असता गजानन शिंदे यांनी वारंवार टाळाटाळ केल्यामुळे आज पर्यंत जमीन नावावर करून दिली नाही.व राहुल गोळे यांना मारहाण करून जीवे ठार मारण्याची धमकी दिली.याप्रकरणी तळा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक सतीश गवई यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हेड कॉन्स्टेबल अविनाश वाघमारे हे पुढील तपास करीत आहेत.

## प्रशासनाचे अजब कारभार जनता दरबारच्या नावाखाली राष्ट्रवादी दरबार!

**महासागर प्रतिनिधी,**





श्रीवर्धन कोलमांडले: श्रीवर्धन तालुक्यामध्ये अनेक वर्षांपासून आमसभा झाली नाही. असे असताना मात्र आमदारांच्या उपस्थित जनता दरबारच्या नावाखाली पक्ष दरबार घेण्यात येत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. या संदर्भात आमदारांना निवेदन देऊन मनसे श्रीवर्धन कडूनही नाराजी व्यक्त करण्यात आली आहे. वृत्ताचे तात्पर्य असे की, तालुक्याला पर्यटन ब दर्जा प्राप्त असताना निसर्गाचा ऱ्हास करून बेकायदेशीर बॉक्साईट उत्खनन, क्षमतेपेक्षा जास्त प्रमाणात होत असलेल्या दहा टायर चौदा व अठरा टायर अवजड वाहतूक यामुळे रस्ते खराब, कोट्यावधी रुपयांचे समुद्र धूपबंधारे अपूर्ण ठेकेदाराकडून काम बंद, वडशेत वावे व मारलं हद्दीत होणारे पाझर तलाव कधी होणार, एसटी आगारातील एसटी समस्या, महावितरण विजेची समस्या, उपजिल्हारुग्णालयातील आरोग्य विषयक समस्या, गेले तीन महिन्यापासून बंद असलेले आधारकार्ड सेवा, तहसीलदार सेतू केंद्र येथील विविध दाखले व इतर कामे समस्या, रजिस्टर, रेशन धान्य व तलाठी मार्फत होणाऱ्या कामांची समस्या, कृषी बी बियाणे , पंचायत समिती कार्यलयातील समस्या, घरकुल हप्ते समस्या, बँक व पोलीस स्टेशन तसेच फॉरेष्ट अशा अनेक समस्या नागरिकांना भेडसावत असतांना यावर जनतेला न्याय मिळावा यासाठी तालुक्यातील जनतेला दहा ते पंधरा दिवस आधी कळवून जनता दरबार घेणे आवश्यक होते. मात्र तसे न करता वेसण घातलेल्या श्रीवर्धन प्रशासनाने निवडक कार्यकर्ते यांना जनता दरबार कार्यक्रमात आमंत्रित करण्यात आले होते. जनता दरबार कार्यक्रमात पत्रकार व विविध प्रतिष्ठीत व सूज्ञ नागरिकांना आमंत्रण दिले नाही याचे कारण गुलदस्त्यात आहे.

## टाऊनशिप येथे ब्लॅक बेल्ट,डिग्री सर्टिफिकेट अवॉर्ड, तसेच कराटे बेल्ट एक्झाम सर्टिफिकेट वाटप

**महासागर प्रतिनिधी,**



उरण: शोतोकोन कराटे टू स्पोर्ट्स असोशिएशन (एस के एस ए.) यांच्या मान्यतेने जेएनपीटी टाऊनशिप येथे ब्लॅक बेल्ट,डिग्री सर्टिफिकेट अवॉर्ड, तसेच कराटे बेल्ट एक्झाम सर्टिफिकेट वाटप करण्यात आले.दिनांक २४ जून २०२५ रोजी जेएनपीटी टाऊनशिप येथे ब्लॅक बेल्ट डिग्री सर्टिफिकेट वाटप करण्यात आले. S K S A महाराष्ट्र प्रेसिडेंट विकास भोईर व दीपक घरत यांना फोर्थ डिग्री ब्लॅक बेल्ट (Yondan) देऊन गौरवण्यात आले. तसेच अजय तांडेल,प्रगती घरत, सोनल तांडेल, मिलन जाधव व किरण हर्गीवाड यांना सेकंड डिग्री ब्लॅक बेल्ट(nidan ) देऊन व अथर्व कडू,साईराज कडू, आशीर्वाद सिंग, ओंकार माने, सचिन गावंड,यांना फर्स्ट डिग्री ब्लॅक बेल्ट (shodan)देऊन गौरवण्यात आले. तसेच एकूण ६६ मुलांना विविध कॅटेगिरी मध्ये कलर बेल्ट एक्झॅम सर्टिफिकेट देण्यात आले.

## माणगाव बायपास न झाल्यास जन आंदोलन करणार - राजीव साबळे
## जलद गतीने काम करण्याची मागणी

**महासागर प्रतिनिधी,**

माणगाव: माणगाव आणि इंदापूर येथील बायपास महामार्गाचे काम जलदगतीने करा अन्यथा जन आंदोलन उभारुन माणगाव शहरातील जूना महामार्गावरुन एकही वाहन पूढे आणि मागे जाऊ न देता महामार्ग बंद करु तसेच माणगाव शहरातील ऐतिहासिक काळ नदीवरील पुल तोडण्याचा विचार मनात देखील आणल्यास तीव्र विरोध करुन महामार्ग बंद करु असा सज्जड इशारा शिंदे शिवसेनेचे प्रवक्ते ॲड. राजीव साबळे यांनी माणगाव नगरपंचायत मध्ये झालेल्या तातडीने बोलावलेल्या बैठकीत बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांना दिला. माणगाव आणि इंदापूर बायपास महामार्गाच्या निविदा काढून कामास मंजुरी देण्यात आली आहे. मात्र अद्यापही वर्क ऑर्डर देण्यात आलेली नाही. हि वर्क ऑर्डर केंद्रीय रस्ते विकास महामंडळाकडून प्राप्त झालेली नाही. हि वर्क ऑर्डर प्राप्त होताच बायपासचे काम सुरू करण्यात येणार आहे. दरम्यान यापूर्वीचे ठेकेदार चेतक कंपनीची वर्क ऑर्डर अजूनही रद्द करण्यात आलेली नाही. तसेच या महामार्गावर लोणेरे येथील उड्डाणपूल पूर्ण झाल्यानंतरच या बायपासची वर्क ऑर्डर देता येईल असे सहाय्यक कार्यकारी अभियंता अक्षरा डहाके यांनी सांगितले. त्यावर ॲड. राजीव साबळे यांनी सांगितले की, माणगाव येथे उपमुख्यमंत्री अजित पवार आणि खासदार सुनील तटकरे यांनी मुंबई गोवा महामार्गाची पाहणी केली असता हा महामार्ग तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे तांत्रिक अडचणी दूर करण्यासाठी प्रयत्न सुरू करा. आपल्या वरीष्ठ अधिकारी यांना बायपास तातडीने पूर्ण करण्याची जबाबदारी सोपविण्यासाठी त्वरित पावले उचलली गेली नाहीत तर आंदोलन सुरू करण्यात येईल असा इशारा दिला. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सहा महिन्यांपूर्वी आले असता महामार्गावरील अपघातात मृत्युमुखी पडलेल्या प्रवाशांना जबाबदार धरून संबंधित ठेकेदारावर गून्हा दाखल केला होता. त्यानंतर आणखी बळी या महामार्गावरील अपघातात गेले आहेत. याला संबंधित अधिकारी जबाबदार आहेत. माणगाव आणि इंदापूर येथील बायपास न झाल्याने अनेक जण प्रवासी वाहतूक कोंडीत तासनतास अडकत आहेत. माणगाव शहरात दररोज ठिकठिकाणी अपघात होऊन नाहक बळी जात आहेत. माणगाव बाजारपेठ मधून सर्व सामान्य माणसाला चालणे मुश्किल आणि अवघड झाले आहे असेही राजीव साबळे यांनी ठणकावून सांगितले. काळ आणि गोद नदी वरील नवीन पूल करताना गणेश घाट, भादावकडे जाणारा रस्ता आणि स्मशानभूमीचे नुकसान झाले आहे. त्यामुळे ते नवीन बांधून द्यावे, बायपास करताना नाणोरे आणि भादाव या गावांचे नुकसान झाले आहे तेथे सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात. बाजारपेठेतील गटारे दुरुस्ती करावी. ढालघर फाटा ते जूने माणगाव गटारांची कामे अर्धवट अवस्थेत असल्याने ती तातडीने पूर्ण करावी, तेथील साईड पट्टी डांबरीकरण करावी, कचरा डेपोची घंटा गाडी महामार्ग ओलांडून देण्यासाठी सर्व्हिस रोड सुरू करावा, महामार्ग आणि बायपास रस्त्यावर स्ट्रीट लाईट लावावेत, महामार्गाच्या अंतर्गत येणाऱ्या भादाव आणि नाणोरे रस्त्यावर स्ट्रीट लाईट लावावेत, प्रकल्प ग्रस्तांना नुकसान भरपाई देण्यात यावी, माणगाव नगर पंचायतीला सोयी सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात, जून पुर्वी बायपास होण्यासाठी तातडीने काम सुरू करावे, बायपास सुरू करण्यापूर्वी मोरबा रोड ते मुंबई गोवा महामार्ग आणि अन्य मार्गांची कामे सुरू करण्यात यावीत सर्व्हिस रोड सुरू करावेत अशा विविध मागण्या तातडीने पूर्ण कराव्यात अन्यथा संपूर्ण माणगावकरांतर्फे जन आंदोलन उभारुन महामार्गावरील वाहतूक बंद करण्यात येईल असा इशारा शिवसेनेचे प्रवक्ते ॲड. राजीव साबळे यांनी दिला.

# उच्च न्यायालयासाठी आरक्षित भूखंडावरील अनधिकृत झोपडपट्टीधारकांना हटविणार

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

मुंबई उच्च न्यायालयासाठी वांद्रे पूर्व येथील देण्यात आलेल्या भूखंडावर काही अतिक्रमित झोपडीधारक आहेत. त्यामुळे ही जागा विकसित करण्यापूर्वी या झोपडपट्टीतील रहिवासी आणि अनिवासी गाळेधारकांना हटवण्यासाठी गृहनिर्माण विभागाने धोरण निश्चित केले आहे. तर पात्र ठरलेल्या झोपडपट्टीधारकांना मालाड पूर्व आणि कांदिवली येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत सामावून घेतले जाणार आहे. त्यामुळे या सदनिकांसाठी एसआरएला द्यावी लागणारी रक्कम तसेच सदनिकांच्या व्यवस्थापनासाठी येणारा खर्च माफ करून हा आरक्षित भूखंड सार्वजनिक बांधकाम विभागास नि:शुल्क हस्तांतरित करण्यास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

वांद्रे (पूर्व) येथील शासकीय वसाहतीतील ९० एकर जागेपैकी ३०.१६ एकर भूखंड उच्च न्यायालयास देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे. या भूखंडावर उच्च न्यायालयासाठी नवीन संकुल उभारण्यात येणार आहे. हा भूखंड सहा टप्प्यात हस्तांतरित करण्याचे निर्देश उच्च न्यायालयाने दिले आहेत. सहा टप्प्यापैकी पहिल्या दोन टप्प्यातील ९.६४ एकर जमीन हस्तांतरित करण्यात आली आहे. तिसऱ्या टप्प्यातील ४.०९ एकर जागेत गौतम नगर आणि समता नगर झोपडपट्टी आहे. उच्च न्यायालयासाठी आरक्षित या भूखंडावर काही अतिक्रमित झोपडीधारक आहेत. त्यामुळे ही जागा विकसित करण्यापूर्वी या झोपडपट्टीतील रहिवासी आणि अनिवासी गाळेधारकांना हटवण्यासाठी गृहनिर्माण विभागाने धोरण निश्चित केले आहे.

तिसऱ्या टप्प्यात झोपडीधारक हटविण्यासाठी कार्यवाही करण्याच्या दृष्टीने पुनर्वसनास पात्र ठरलेल्या झोपडीधारकांना मालाड पूर्व आणि कांदिवली येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेतील २५४ सदनिकांसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाला ३१ कोटी ७५ लाख रुपये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास द्यावे लागणार होते. ही रक्कम माफ करण्यात आली आहे . तसेच या ठिकाणच्या १३८ अनिवासी आणि ११६ निवासी गाळयासाठीचे तसेच उर्वरित भूखंडावरील गाळेधारकांची झोपडपट्टी पुनर्विकास महामंडळाकडून पात्रता निश्चित झाल्यानंतर त्यांच्या सदनिकांच्या व्यवस्थापनासाठी येणारा खर्च माफ करून असे गाळे देखील सार्वजनिक बांधकाम विभागास नि:शुल्क हस्तांतरित करण्यास मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली.

**हडकोच्या २ हजार कोटींच्या कर्जास शासन हमी**

महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजनेंतर्गत हडको संस्थेकडून घेण्यात येणाऱ्या दोन हजार कोटींच्या कर्जास शासन हमी देण्याचा आणि त्यापोटीचे हमी शुल्क माफ करण्याचा निर्णय आज झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला. केंद्र पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत आणि नगरोत्थान अभियनांतर्गत प्रगतीपथावर असलेल्या प्रकल्पांच्या उभारणीसाठी स्वहिश्श्यापोटी संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांना निधी उभा करावा लागतो. त्यासाठी राज्यात महाराष्ट्र नागरी पायाभूत सुविधा विकास कर्ज योजना राबविण्यात येत आहे.

त्यांतर्गत हडको या वित्तीय संस्थेकडून हे कर्ज घेण्यात येणार आहे. यात छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पाच्या हिश्श्यापोटीचे ८२२ कोटी २२ लाख, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या चार मलनि:सारण प्रकल्पासाठी २६८ कोटी ८४ लाख रुपये, मिरा-भाईंदर महापालिकेच्या पाणी पुरवठा प्रकल्पाच्या हिश्श्यापोटीच्या ११६ कोटी २८ लाख रुपयांच्या प्रस्तावांसह अन्य स्थानिक स्वराज्य संस्थाच्या मागण्यांचा समावेश आहे.

**महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर (सुधारणा) विधेयकाचे प्रारूप मंजूर**

महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर अधिनियम २०१७ मध्ये सुधारणा करण्यासाठी विधेयकाच्या प्रारूपास आणि ते विधिमंडळाच्या आगामी अधिवेशनात मांडण्यास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. केंद्र सरकारने केंद्रीय वस्तू आणि सेवा कर अधिनियम २०१७ च्या विविध कलमांमध्ये तसेच अनुसूची तीनमध्ये बदल केले आहेत. यासाठी वस्तू आणि सेवा कर परिषदेच्या ५५ व्या बैठकीत शिफारशी करण्यात आल्या होत्या. त्यानुसार केंद्र सरकारने वित्त अधिनियम २०२५ संमत केला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्रीय आणि महाराष्ट्र वस्तू व सेवा कर अधिनियमातील तरतुदीत एकसूत्रता आणि व्यवहार्यता राखण्यासाठी अधिनियमात आवश्यक त्या सुधारणा करणे आवश्यक होते. त्यासाठीच्या महाराष्ट्र वस्तू आणि सेवा कर (सुधारणा) विधेयक २०२५ मांडण्यास तसेच त्याच्या प्रारूपास आज मान्यता देण्यात आली.

**थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा) विधेयकाच्या प्रारूपास मंजुरी**

महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा) विधेयक २०२५ विधिमंडळाच्या प्रारूपास आणि आगामी अधिवेशनात मांडण्यास आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.

वस्तू आणि सेवा कर विभागाकडून विविध अधिनियमाखाली थकबाकी वसूल करण्यासाठी महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क ( सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या ) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत अधिनियम २०२५ अंमलात आणला आहे. या अधिनियमाच्या तरतुदीनुसार थकबाकीची तडजोड करण्याचा कालावधी २१ मार्च ते ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत आहे. या अधिनियमातील अर्जदार या व्याख्येत सुधारणा करण्यात येणार आहे.

ज्यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील कंपनी, सार्वजनिक क्षेत्रातील बँका किंवा सरकारी संस्था, विभाग, प्राधिकरणे, महामंडळे, ग्रामीण आणि नागरी स्थानिक संस्था ज्या कंपनी कायदा २०१३ अंतर्गत नोंदणीकृत नाहीत परंतु केंद्र किंवा कोणत्याही राज्य किंवा केंद्रशासित प्रदेश यांच्या विधिमंडळाद्वारे किंवा सरकारी ठरावाद्वारे स्थापित आहेत, अशाचा यामध्ये समावेश करण्यात येणार आहे. यामुळे जुनी वसुलीची प्रलंबित प्रकरणे तडजोड रक्कम भरून बंद होतील. यामुळे शासनाचा अनेक काळ थकित असलेला महसूल प्राप्त होईल. यासाठी महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा) विधेयक मांडण्यास आणि त्याच्या प्रारूपास आज मान्यता देण्यात आली.

# मोठ्या पदांची अपेक्षा नको कामाचा आवाका दाखवा- अजितदादा



**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

"सर्वांना मोठी पदं मिळतीलच असं नाही, पण छोटी पदं घेऊन मोठं काम करता येतं हे दाखवून द्या!" अशा स्पष्ट शब्दांत उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी आपल्या पक्षातील कार्यकर्त्यांना आणि नेत्यांना आज चिमटा काढला. मुंबईतील राष्ट्रवादी काँग्रेस कार्यालयात एका पक्ष प्रवेश कार्यक्रमात त्यांनी ही थेट कानउघडणी केली.

हडपसरचे माजी आमदार आणि उद्धव ठाकरे गटातील जेष्ठ नेते महादेव बाबर यांनी आज आपल्या असंख्य समर्थकांसह अजित पवारांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. यावेळी पुणे, सांगली, हिंगोली, नांदेड, रत्नागिरी या जिल्ह्यांतील विविध पक्षांतील पदाधिकारीही राष्ट्रवादीत दाखल झाले.

महादेव बाबर यांचा पक्षप्रवेश कौतुकास्पद ठरवताना अजित पवार म्हणाले, "बाबर यांनी पूर्वी माझ्यासोबत काम केलं आहे. त्यांच्या आगमनाने पुणे शहरात पक्ष अधिक बळकट होईल."

अजित पवारांनी पक्षातील कार्यकर्त्यांना सुनावताना स्पष्ट केले की, "मोठी पदं मिळाली नाहीत म्हणून खचून जाऊ नका. लहान पदं घेऊनही आपण संघटनात्मक ताकद सिद्ध करू शकतो. आपल्याला संघटनात्मक वाढ साधायची आहे, पदांच्या मागे धावून नव्हे!"

ते पुढे म्हणाले, "आपल्याला शून्यातून विश्व निर्माण करता आलं पाहिजे. कामाच्या नावाने कोणताही कमीपणा वाटून घेता कामा नये. आपण सर्वांनी मिळून राष्ट्रवादीचा झेंडा राज्यभर फडकवायचा आहे."

पक्षप्रवेशाबाबत अजित पवारांनी धोरण स्पष्ट करत सांगितले की, "ज्यांना पक्षात घ्यायचं त्यांची प्रतिष्ठा चांगली असावी, कुणाचेही वेडेवाकडे धंदे नकोत. महिला भगिनींचा सन्मान राखला गेला पाहिजे आणि कुठेही उर्मटपणा खपवून घेतला जाणार नाही."

# चौथ्या महिला धोरण २०२४च्या माध्यमातून महिला व मुलींसाठी सक्षम वातावरण तयार करणार

## उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

चौथे महिला धोरण २०२४ जाहीर झाले असून या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी विविध विभागांनी प्रभावीपणे काम करावे.या धोरणाच्या माध्यमातून राज्य शासन महिला व मुलींसाठी सक्षम वातावरण तयार करत आहे. त्यामुळे मुंबई शहरातील महिलांसाठी असलेल्या योजनांबाबत एकाच ठिकाणी माहिती मिळण्यासाठी एक नवीन ॲप तयार करण्याचे स्पष्ट निर्देश उपमुख्यमंत्री व मुंबई शहर पालकमंत्री एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी येथे दिले.



चौथे महिला धोरण २०२४ जिल्हास्तरीय अंमलबजावणी सुकाणु समितीची बैठक आज उपमुख्यमंत्री व मुंबई शहरचे पालकमंत्री शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत मुंबई जिल्हाधिकारी कार्यालयात पार पडली.यावेळी उपमुख्यमंत्री कार्यालयाचे प्रधानसचिव नविन सोना,जिल्हाधिकारी आंचल गोयल,अपर जिल्हाधिकारी रवि रतन कटकधोंड,निवासी उपजिल्हाधिकारी डॉ.शिवनंदा लंगडापुरे, उपजिल्हाधिकारी महादेव किरवले, समाजकल्याण अधिकारी रविकिरण पाटील, सहायक आयुक्त, कौशल्य विकास, मुंबई शहर शैलेश भगत, मुंबई शहरच्या महिला व बालविकास अधिकारी शोभा शेलार यासह विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले, मुंबई शहरातील लोकसंख्या लक्षात घेवून येथील नोकरदार महिलांसाठी हॉस्टेल, लहान मुलांसाठी पाळणाघर, झोपडपट्टी भागात तसेच इतर गरजू महिला असतील त्या ठिकाणी महिला बचत गट स्थापन करणे, बचतगटांना रोटेशन पध्दतीने स्टॉल उपलब्ध करून देणे, महिलांचा पर्यटन क्षेत्रात सहभाग वाढावा यासाठी पर्यटनाचे प्रकल्प विकसित करणे, महिला मच्छिमारांसाठी शासकीय योजना राबविणे यावर भर देण्यात यावा. आदिवासी महिलांसाठी असलेल्या विविध योजना प्रभावीपणे राबवाव्यात. घरांचा प्रश्न सोडवण्यासाठी नियोजित प्रकल्प वेळेत पूर्ण करणे, महिलांना आरोग्य सुविधा तत्काळ देणे तसेच काळानुरूप आरोग्य सुविधा वाढविणे याबाबत काम करावे. राज्य सरकार कडून सरकार आपल्या दारी, मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना, लखपती दीदी योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण देणे यासारख्या योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात असल्याचेही त्यांनी यावेळी नंतर पत्रकारांशी बोलताना सांगितले.

# कोल्हापुरात काँग्रेसला शिंदे गटाचा दणका

## माजी महापौरांसह २५ माजी नगरसेवकांचा शिवसेनेत प्रवेश

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

कोल्हापूर महापालिकेत महायुतीचा भगवा फडकवण्याचा निर्धार करत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे. कोल्हापूर महानगरपालिकेतील २५ माजी नगरसेवक, ३ माजी महापौर आणि असंख्य काँग्रेस पदाधिकाऱ्यांनी शिवसेनेत जाहीर प्रवेश केला आहे. या पक्षप्रवेश कार्यक्रमामुळे कोल्हापुरात महापालिका निवडणुकीपूर्वीच वातावरण तापले आहे.

गेल्या संध्याकाळी शिंदे यांच्या मुक्तागिरी शासकीय निवासस्थानी पार पडलेल्या या भव्य पक्षप्रवेश सोहळ्याला कोल्हापुरातील




राजकीय वजनदार नेते व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यात माजी महापौर निलोफर आजरेकर, प्रतिभा नाईकनवरे, सुनील कदम, माजी स्थायी समिती सभापती शारंगधर देशमुख, माजी उपमहापौर दिगंबर फराकटे, माजी सभापती अभिजित चव्हाण, माजी शिक्षण समिती सभापती रशीद बारगीर, तसेच अनेक माजी महिला नगरसेविका व पदाधिकारी यांचा समावेश होता. युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष किरण पाटील, जिल्हा सचिव कुलदीप सावरतकर, तसेच अभिजित खतकर, संजय सावंत, सुजल चव्हाण यांसह अनेक काँग्रेस पदाधिकाऱ्यांनीही यावेळी शिवसेनेत प्रवेश केला. उपमुख्यमंत्री शिंदे यांनी स्वागत करताना म्हटलं की, "कोल्हापूर जिल्ह्यातील अनेक महत्त्वाचे नगरसेवक आता आमच्यात आले आहेत, हे विकासाच्या राजकारणाचं यश आहे. गेल्या अडीच वर्षांत ४२०० कोटींचा निधी कोल्हापूरच्या विकासासाठी दिला. आता हे शहर पुरमुक्त करण्याचा संकल्प आम्ही केला आहे." त्यांनी स्पष्ट आवाहन केलं की, "आगामी महापालिका निवडणुकीत भगवा फडकवण्यासाठी सर्वांनी मैदानात उतरा."

# सोयाबीन व भुईमूग बियाण्याचे वितरण सुरू

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

राष्ट्रीय खाद्यतेल अभियान - तेलबिया (NMEO - Oilseeds) अंतर्गत सन २०२५-२६ या वर्षात शेतकऱ्यांना १०० टक्के अनुदानावर प्रमाणित सोयाबीन व भुईमूग बियाण्यांचे वितरण करण्यात येत आहे. हे वितरण महाडीबीटी पोर्टलद्वारे "प्रथम अर्ज, प्रथम सेवा" (FCFS) तत्वावर पार पाडण्यात येत आहे.राज्यातील शेतकऱ्यांना अनुदानावर गुणवत्ता असलेले बियाणे देण्यासाठी कृषी विभाग कटिबद्ध असल्याचे कृषिमंत्री ॲड माणिकराव कोकाटे यांनी सांगितले.

या योजनेअंतर्गत सोयाबीनसाठी एकूण ४६,५०० क्विंटल आणि भुईमूगसाठी १६,००० क्विंटल बियाण्यांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. सद्यस्थितीत महाडीबीटी पोर्टलद्वारे सोयाबीनसाठी ४४,३१७.१३ क्विंटल (९५.३१%) आणि भुईमूगसाठी ६,८५७.५४ क्विंटल (४२.८६%) बियाणे शेतकऱ्यांना वाटप करण्यात आले आहे.

शेतकऱ्यांनी अर्ज केल्यानंतर त्यांना 'एसएमएस'द्वारे सूचना देण्यात येत असून, त्यानुसार संबंधित तालुका कृषी अधिकारी कार्यालयाशी संपर्क साधून पाच दिवसांच्या आत बियाण्याचा लाभ घ्यावा लागतो. अन्यथा लाभाची नोंद रद्द केली जाते. बियाणे एकदाच उचलणे आवश्यक असून, पुन्हा मागणी केल्यास बियाण्याची किंमत लागू असणार आहे.

# शाळा, महाविद्यालयांबाहेर ड्रग्ज, सिगारेट विक्रीची न्यायालयाकडून दखल

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

शैक्षणिक संस्थांबाहेर सिगारेट आणि ड्रग्जच्या मोठ्या प्रमाणात विक्रीवरील बातम्यांची मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने स्वतःहून दखल घेतली आहे आणि विद्यार्थ्यांना अशा बंदी घातलेल्या वस्तू वापरण्यास प्रवृत्त केल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. न्यायाधीश रवींद्र घुगे आणि वाय जी खोब्रागडे यांच्या खंडपीठाने २० जून रोजी म्हटले आहे की शाळा आणि महाविद्यालयांबाहेर ड्रग्ज, सिगारेट आणि ई-सिगारेट

यासारख्या बंदी घातलेल्या वस्तू विकण्याचा व्यवसाय करणाऱ्या लोकांबद्दल "त्रासदायक" बातम्या आल्या आहेत. गुन्हेगारांनी अशा वस्तूंनी तरुण विद्यार्थ्यांना लक्ष्य केले आहे, असे न्यायालयाने म्हटले आहे. "प्रभावशाली वयाच्या तरुण विद्यार्थ्यांना अशा ड्रग्ज आणि सिगारेटच्या सेवनात प्रवृत्त



केले जाते, ज्यामुळे व्यसन आणि त्यांच्या शारीरिक विनाशाचा मार्ग जवळज वळ मोकळा होतो," असे न्यायालयाने म्हटले आहे. छत्रपती संभाजीनगर (पूर्वी औरंगाबाद) येथील पोलिसांना "खऱ्या भावनेने" कृती करण्याचे आणि नागरिकांना, विशेषतः तरुण विद्यार्थ्यांना अशा बेकायदेशीर कृत्यांपासून संरक्षण मिळावे याची खात्री करण्याचे निर्देश दिले आहेत.

न्यायालयाने वरिष्ठ वकील पी.आर. कटनेश्वरकर यांची मदत करण्यासाठी नियुक्ती केली आणि त्यांना या प्रकरणात योग्य जनहित याचिका दाखल करण्यास सांगितले जेणेकरून अधिकाऱ्यांना योग्य निर्देश देता येतील.

# दोन बायकांमुळे निवडणूक रद्द होऊ शकत नाही

## आमदार राजेंद्र गावित यांना दिलासा

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

एखाद्या लोकप्रतिनिधीला बहुपत्नीत्वच्या मुद्द्यावरून हटविणे योग्य नाही. तो आमदारपदावरून हटविण्याचा आधार होवू शकत नाही, असे स्पष्ट करत उच्च न्यायालयाने शिवसेना आमदार राजेंद्र गावित

यांचा विजय रद्दबातल घोषित करण्याची मागणी करणारी याचिका फेटाळून लावली. न्या. संदिप मारणे यांच्या एकलपीठाने हा निर्णय देताना आमदार गावित यांनी त्यांच्या वैवाहिक स्थितीबद्दल प्रामाणिक माहिती देणे निवडणूक नियमांचे उल्लंघन करत नाही, असे न्यायालयाने स्पष्ट केले. सामाजिक कार्यकर्ते आणि पालघरचे मतदार सुधीर जैन यांनी यांनी शिवसेना आमदार राजेंद्र गावित यांना दोन पत्नी असल्याने त्यांची आमदारकी रद्द करावी, अशी विनंती करणारी याचिका उच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती संदिप मारणे यांच्यासमोर सुनावणी झाली. न्यायालयाने ही याचिका फेटाळून लावली. गावित हे आदिवासी भिल्ल समुदायाचे आहेत. त्यांच्यात बहुपत्नीत्वाला प्रथेनुसार बंदी नाही. त्यांनी निवडणूक प्रतिज्ञापत्रात त्यांच्या दोन्ही पती-पत्नींचे पॅन क्रमांक आणि आयकर रिटर्न स्थितीसह तपशील दिला आहे. समुदायामध्ये बहुपत्नीला परवानगी आहे, त्या समाजातील व्यक्तीला निवडणुकच लढविण्यात येणार नाही. आमदार गावित यांनी त्यांच्या वैवाहिक स्थितीबद्दल त्यांनी प्रामाणिक माहिती देणे निवडणूक नियमांचे उल्लंघन करत नाही, असे न्यायालयाने म्हटले आहे.

# विद्यार्थी सुरक्षेच्या उपाययोजनांची पाहणी करा : उच्च न्यायालय

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

बदलापूरच्या शाळेत घडलेल्या घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या समितीने सूचनांची काटेकोरपणे अंमलबजाणी होते की नाही याची पाहणी करून सहा आठवड्यांत अहवाल सादर करा, असा आदेश उच्च न्यायालयाने दिला. बदलापूर घटनेच्या पार्श्वभूमीवर भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी न्यायालयाने निवृत्त न्यायमूर्ती शालिनी फणसाळकर-जोशी आणि निवृत्त आयपीएस मीरा बोरवणकर यांची समिती स्थापन केली होती. या समितीने काही सूचना केल्या आहेत. या सर्व सूचना राज्य सरकारने स्वीकारून अध्यादेश जारी केला आहे. त्याची तातडीने अंमलबजावणी केली जाणार असल्याचे राज्य सरकारने हायकोर्टात स्पष्ट केले. बदलापूर येथील लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर मुले शाळेत असताना तसेच ती शाळेतून ये-जा करत असताना त्यांच्यासोबत अशा घटना घडू नयेत यासाठी सुरक्षिततेचे उपाय सुचवण्यासाठी हायकोर्टाने सप्टेंबर २०२४ मध्ये ही उच्चस्तरीय समिती स्थापन केली होती.

**समितीच्या शिफारशी**

बदलापूरच्या घटनेनंतर प्रत्येक शाळेच्या आवारात सीसीटीव्ही अनिवार्य करणे, पोलिसांकडून शाळेतील कर्मचाऱ्यांची चारित्र्य पडताळणी करणे आणि शाळेत असताना, तसेच शाळेच्या बसमधून प्रवास करतानाच्या मुलांच्या सुरक्षित प्रवासाची जबाबदारीही शाळेनेच घ्यावी, मुलांना चांगला स्पर्श आणि वाईट स्पर्शाबाबतचा जनजागृती तसेच ज्ञान द्यावे. लहान मुलांना सायबर गुन्ह्यांबद्दल जागरूक करत १०९८ हा टोल-फ्री हेल्पलाइन क्रमांक सर्व प्रमुख ठिकाणी प्रदर्शित करण्यात यावा आदी शिफारशी समितीने केल्या आहेत.

## महत्त्वाच्या बातम्या

### मंत्रालयाची सुरक्षा अधिक भक्कम गार्डन गेटजवळ चेकिंग पोस्ट

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

मंत्रालय संवेदनशील असून मंत्रालयाच्या सुरक्षेसाठी मंत्रालय गार्डन गेटजवळील मोकळ्या जागेत व्हिजीटर प्लाझाचे काम पूर्ण करण्यात आले आहे. आता गार्डन गेटजवळ चेकींग पोस्ट अभ्यासगतासाठी वेटींग रुम, प्रवेश करणाऱ्यांच्या बॅग ठेवण्यासाठी लॉकर, स्कॅनर अशा सुविधा उपलब्ध करण्यात येणार आहे. यासाठी ६४ लाख २८ हजार ६०३ रुपये खर्च करण्यास राज्य सरकारने मंजुरी दिली आहे. अद्ययावत व्हिजीटर प्लाझा मंत्रालयातील गार्डन गेट येथील मोकळ्या जागेत अद्ययावत सुरक्षा तपासणी कक्ष पास काउंटर, अभ्यागतांसाठी वेंटिंग रुम, प्रवेश करणाऱ्यांसाठी लॉकर, स्कॅनर इत्यादी सुविधा येणार आहे.

### विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी वाहतूक विभागाकडून जनजागृती

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

विद्यार्थ्यांचा शालेय प्रवास सुरक्षित व्हावा यासाठी वाहतूक विभागाच्या वतीने वरळी येथील वाहतूक विभागाच्या मुख्यालयात मंगळवारी विशेष सेमिनार आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान डॉ. प्रियंका नारनवरे, अप्पर पोलीस आयुक्त (वाहतूक), मुंबई शहर यांनी भूषवले. या सेमिनारमध्ये मुंबई पूर्व उपनगरे वाहतूक विभागातील पालिका शाळा, खासगी शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांच्या प्रमुखांची उपस्थिती होती. तब्बल १२० शाळांचे प्राचार्य, मुख्याध्यापक व शिक्षक सहभागी झाले होते. यावेळी पोलीस उपायुक्त प्रदीप चव्हाण, सहाय्यक पोलीस आयुक्त बागल तसेच वाहतूक विभागाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षकही उपस्थित होते. सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांच्या प्रवासातील सुरक्षिततेसंदर्भात विविध मुद्यांवर चर्चा झाली. शाळेच्या बस व व्हॅन चालवणाऱ्या चालकांचे तसेच क्लिनर, केअरटेकर यांचे पोलिस व्हेरिफिकेशन करणे, वाहनांची नियमित तपासणी, मुलींच्या वाहनांमध्ये महिला केअरटेकर असणे यावर भर देण्यात आला. तसेच बस व व्हॅनसाठी स्पीड मर्यादा निश्चित करणे, निश्चित मार्ग ठरवणे, वाहतुकीचे सर्व नियम काटेकोरपणे पाळले जावेत यासाठी शाळांनी विशेष खबरदारी घ्यावी, असे डॉ. नारनवरे यांनी यावेळी सांगितले.

### श्री महालक्ष्मी मंदिर न्यासतर्फे विद्यार्थ्यांना मिळणार शिष्यवृत्ती

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष जून २०२४ ते मे २०२५ या कालावधीत शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांसाठी मुंबईतील श्री महालक्ष्मी मंदिर ट्रस्टतर्फे गुणवत्ताधारित शिष्यवृत्ती जाहीर करण्यात आली आहे. ही शिष्यवृत्ती इयत्ता ७ वी ते पदव्युत्तर स्तरापर्यंत विज्ञान, इंजिनिअरिंग व अभियांत्रिकी शाखांतील फक्त हिंदू विद्यार्थ्यांसाठी असून, अर्जदाराने प्रथमच झालेल्या वार्षिक परीक्षेत किमान ७० टक्के गुणांनी उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. अर्जासोबत वार्षिक परीक्षेचे गुणपत्रक, शाळा सोडल्याचा दाखला (ज्यामध्ये हिंदू धर्म नमूद आहे), शिधावाटप पत्रिका (अनुक्रमांक स्पष्ट दिसावा), सध्याचा व पत्रिकेवरील पत्ता सारखाच असल्याचा पुरावा किंवा त्यातील फरकाचे स्पष्टीकरण, पालकांचा मासिक उत्पन्नाचा दाखला, स्वतःचा पत्ता असलेले पोस्टाचे पाकीट आणि आई-वडील-पालक किंवा विद्यार्थ्यांचा रद्द केलेला धनादेश जोडणे आवश्यक आहे. ही शिष्यवृत्ती केवळ मुंबई, नवी मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठीच असून अर्जदारांनी मंदिराच्या भुलाभाई देसाई रोड येथील कार्यालयात प्रत्यक्ष जाऊन अर्ज सादर करावेत. अर्ज भरताना मूळ कागदपत्रे जोडू नयेत. अर्जाची अंतिम तारीख लवकरच जाहीर करण्यात येणार असून अधिक माहितीसाठी www.mahalakshmi-temple.com या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

### निवडणूक कामाला शिक्षक संघटनेचा विरोध

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर मुंबई महानगरपालिकेने शिक्षण विभागात कार्यरत शिक्षकांच्या मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी पर्यवेक्षक म्हणून नेमणुका केल्या आहेत. तथापि, त्याचा दैनंदिन कामकाजावर परिणाम होऊ नये. यासाठी निवडणुकीशी संबंधित कामे ऑनलाईन पद्धतीने करण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र या सूचनांना आणि शिक्षकांना देण्यात आलेल्या अतिरिक्त कार्यभाराला महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेने तीव्र विरोध केला आहे. शिक्षकांच्या या नेमणुकांना महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेकडून थेट विरोध करण्यात आलेला आहे. शिक्षकांना हे अतिरिक्त काम करणे अवघड असल्याचे संघटनेचे म्हणणे आहे. या कामाचा शिक्षकांच्या मानसिकतेवर परिणाम होऊ शकतो, असेही संघटनेकडून सांगण्यात आले आहे.

### मोघरपाडा मेट्रो कारशेडचा मार्ग मोकळा

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

ठाण्यातील मोघरपाडा मेट्रो कारशेडच्या बांधकामाला विरोध करणाऱ्या याचिकेची उच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली. मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठाने याचिकाकर्त्यांचा चांगलाच समाचार घेतला.

६० वर्षे शेती केली म्हणून जमीन तुमच्या मालकीची झाली का असा सवाल यावेळी उपस्थित केला. हा प्रकल्प जनहिताचा आहे असे स्पष्ट करत याचिका निकाली काढली. ठाणे येथील मोघरपाडा येथे १७४ हेक्टर क्षेत्रावर एमएमआरडीए मार्फत मेट्रो कारशेड उभारण्यात येणार आहे. याला आक्षेप घेत खारभूमी कृषी समन्वय समितीने मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती आलोक आराधे आणि न्यायमूर्ती संदीप मारणे यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. यावेळी याचिकाकर्त्यांच्यावतीने या जागेवर अनेक दशके आमचे वास्तव्य असून आम्ही तेथे शेती करतो. कारशेडमुळे आमच्या उत्पन्नाचे साधन हिरावले असल्याने आम्हाला जमीन द्यावी अशी मागणी केली. त्यावेळी एमएमआरडीएच्या वतीने ॲड. अक्षय शिंदे यांनी याचिकाकर्त्यांचा दावा फेटाळून लावला. तसेच तहसीलदार सुचित्रा पाटील यांच्या वतीने प्रतिज्ञापत्र दाखल केले. कायद्यानुसार एमएमआरडीएला जमीन दिली असून मेट्रो ही प्रवाशांच्या सेवेसाठी धावणार आहे. हा लोकोपयोगी प्रकल्प असल्याने त्याला विरोध करू नये. हायकोटनि याची दखल घेत याचिकाकर्त्यांना दिलासा देण्यास नकार दिला व याचिका निकाली काढली. न्यायालयाच्या या निर्णयामुळे मोघरपाडा कारशेडचा मार्ग मोकळा झाला आहे.

### ॲक्युपंक्चर पदविकेची नोंदणी जुलैमध्ये

**मुंबई, दि. २५ प्रतिनिधी**

महाराष्ट्र क्युपंक्चर परिषदेअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या ॲक्युपंक्चर पदविका अभ्यासक्रमाच्या नोंदणी प्रक्रियेला जुलैच्या पहिल्या आठवड्यापासून सुरूवात होणार आहे.

राज्य सरकारने गतवर्षीपासून दोन वर्षाच्या क्युपंक्चर पदविका अभ्यासक्रमाला मान्यता दिली आहे. विज्ञान, वाणिज्य व कला अशा कोणत्याही शाखेतून इयत्ता बारावी उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांला या अभ्याक्रमासाठी अर्ज करता येणार आहे.

